महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग
उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,सातारा
फोन नंबर:-०२१६२-२३४१८९

स्वयंसहाय्यता गटांचे अभिलेखे छपाई बाबत इच्छुक पुरवठादारांकडुन अर्ज मागविण्याबाबात.

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून पं.दिनदयाळ उपाध्याय अंतोदय योजना(राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची)सुरूवात केली आहे.या अभियनाच्या अंमलबजावणी साठी राज्यात उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे.या अभियानाची अंमलबजावणी जिल्हा स्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या मार्फत करण्यात येते.जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सातारा येथील स्वयंसहाय्यता गटांसाठी लागणारे अभिलेखे छपाई करणे आहे.त्याकरिता प्रिंटीगचा व्यवसाय करणा-या व्यवसायिकांकडून मर्यादीत ई-निविदा(Limited-tender)या खरेदी प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येणार आहे.सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रिंटीग व्यवसाय करणा-याकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१.DSC(Digital Signature Certificate)
२. https://mahatenders.gov.in या संकेतस्थळ/पोर्टलवर नोंदणीकृत असावा.
३.Shop & Establishment Act अंतर्गत नोंदणीकृत किंवा इतर सक्षम अधिकारी यांनी सदर व्यवसायासाठी नोंदणीकृत केलेले प्रमाणपत्र
४. PAN कार्ड असावे
५. GST नोंदणी प्रमाणपत्र (GST registration certificate )असावे.

वरिल अटींची पूर्तता करणा-या इच्छुक पुरवठादारांनी त्यांच्या https://mahatenders.gov.in वर नोंदणीकृत केलेला login ID तसेच वर नमूद केलेल्या कागदपत्रासह वर दिलेल्या पत्यावर किंवा drdasatara@gmail.com या ईमेल ID वर दिनांक ०९/०७/२०१८,दुपारी २.३० वाजेपर्यंत लेखी अर्ज करण्यात यावा.मर्यादीत ई-निविदा https://mahatenders.gov.in वर प्रसिध्द झाल्यानंतर कोणत्याही पुरवठादाराना सदर ई-निविदा प्रक्रीयेमध्ये सहभागी करून घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सदर निविदा प्रक्रीयेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक प्रिंटीग व्यवसाय करणा-या कडून कोणतीही निविदा शुल्क व EMD रक्कम घेण्यात येणार नाही.

सहा.प्रकल्प अधिकारी(वि.सा.व बॅ.जो.)तथा
सदस्य सचिव,संपादणुक समिती
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,सातारा

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा
र. नं. MAH/229 Satara १२/१०/८६
सातारा

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद तथा अध्यक्ष कार्यकारी समिती,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,सातारा